# भारतीय जनता पक्ष

केंद्रिय कार्यालय
11,अशोक रोड, नवी दिल्ली
फोन-230057 फॅक्स-23005787

नवी दिल्ली 15 जानेवारी 2014 - "मिशन सुशासन" चा संकल्प तसेच लक्ष घेऊन भाजपाची राष्ट्रीय कार्यकारिणी तसेच राष्ट्रीय परिषदेची तीन दिवसीय बैठक 17 जानेवारी 2014 पासून सुरु होत आहे.

भाजपा उपाध्यक्ष श्री मुख्तार अब्बास नकवी यांनी सांगितले की 17 जानेवारी पासून राष्ट्रीय कार्यकारिणी ची बैठक होईल तसेच 18 आणि 19 जानेवारीला रामलीला मैदानात राष्ट्रीय परिषद होईल. 17 जानेवारीला राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक एन.डी.एम.सी कन्वेन्शन सेंटर मध्ये सकाळी 11 वाजता सुरु होईल. तर राष्ट्रीय परिषद 18 जानेवारीला रामलीला मैदानात सकाळी 10 वाजता प्रारंभ होईल आणि 19 जानेवारीला सायंकाळपर्यंत चालू राहील.

श्री नकवी यांनी असे सांगितले की, 18 आणि 19 जानेवारीला होणा-या राष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय पदाधिकारी, राष्ट्रीय कार्यसमिती आणि राष्ट्रीय परिषदेचे सर्व सदस्य शामील होतील. बैठकीत मोर्चाचे राष्ट्रीय पदाधिकारी, विभागीय राष्ट्रीय संयोजक-सह-संयोजक, सर्व खासदार, आमदार, प्रदेशातील पदाधिकारी, मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष आणि महामंत्री,विभागीय प्रदेश संयोजक, सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष व महामंत्री, महापोर-उपमहापोर, पार्षद दलाचे नेते, नगर पालिका अध्यक्ष, जिल्हा पंचायत अध्यक्ष-उपाध्यक्ष आणि लोकसभा क्षेत्राचे संयोजक आणि पालक भाग घेणार आहेत.

श्री नकवी यांनी असे सांगितले की, तीन दिवस चालणारी राष्ट्रीय कार्यकारिणी तसेच राष्ट्रीय परिषदेत देशातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षा, आंतरिक सुरक्षा आणि मुद्द्यांवर चर्चा होईल. येणा-या लोकसभा निवडणुकीत श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये "मिशन सुशासन"ची सफलता हेतू आणि रणनिती यावर विस्तृत चर्चा होईल. राष्ट्रीय अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांचे अध्यक्षीय भाषणाने कार्यकारिणीची तसेच परिषदेचा शुभारंभ होईल.

श्री नकवी यांनी असे सांगितले की, पक्षाचे वरिष्ठ नेते श्री लालकृष्ण आडवाणी, पक्षाचे पंतप्रधान पदाचे उमेदवार श्री नरेंद्र मोदी, लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या श्रीमती सुषमा स्वराज, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते श्री अरुण जेटली, श्री मुरली मनोहर जोशी. श्री एम.व्यंकय्या नायडू, श्री नितीन गडकरी यांच्यासह भाजपा शासित राज्यांतील मुख्यमंत्री श्री शिवराज सिंह चौहान, श्रीमती वसुंधरा राजे सिंधिया, डॉ. रमण सिंह,श्री मनोहर पर्रीकर बैठकीत उपस्थित राहतील.

श्री नकवी यांनी सांगितले की, मागील काही दिवसांमध्ये तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपाने शानदार विजय मिळविला तसेच लोकसभा निवडणुकीत संपूर्ण देशात भाजपा आणि श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रती लोकांचा विश्वास तसेच समर्थन "मिशन सुशासन" बदलण्याचे लक्ष तसेच संकल्प ठेवून ही बैठक होत आहे. आज देशात कॉंग्रेसच्या कुशासन आणि भ्रष्टाचाराच्या विरुद्ध क्रांतीचे वातावरण आहे. लोकांना भाजपा आणि श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने केंद्रात एक भारत- श्रेष्ठ भारत चे लक्ष पूर्ण करणारी सरकार व पंतप्रधान पाहिजे आहे.

श्री नकवी यांनी असे सांगितले की, 18 आणि 19 रोजी होणा-या राष्ट्रीय परिषदेत संपूर्ण देशातून सुमारे 10 हजार प्रतिनिधी भाग घेतील. ज्यामध्ये आंध्रप्रदेश मधील सुमारे 600, अंदमान-निकोबार येथून सुमारे 50, अरुणाचल प्रदेशातून सुमारे 95, आसाम मधुन 250, बिहार मधुन सुमारे 500, छत्तीसगड मधुन सुमारे 300, दादरा-नगर हवेली मधून सुमारे 40, दमण-द्वीप मधून सुमारे 35, दिल्ली येथून सुमारे 260, गोवा येथून सुमारे 60, गुजरात येथून सुमारे 750, हरियाणा मधुन सुमारे 200, हिमाचल मधुन 200, जम्मू- काश्मीर मधुन सुमारे 195, झारखंड मधुन सुमारे 250, कर्नाटकातून सुमारे 450, केरळातून 140, लक्षद्विप मधुन सुमारे 30, मध्यप्रदेशातून सुमारे 900, महाराष्ट्रातून सुमारे 700, मणिपूर सुमारे 12, मेघालयातुन सुमारे 30, मिझोराम येथून सुमारे 18, नागालँड येथुन सुमारे 20, ओरिसातून सुमारे 275, पॉंडिचेरी येथून सुमारे 50, पंजाब येथुन सुमारे 250, राजस्थान येथुन सुमारे 650, सिक्कीम येथून सुमारे 30, तामिळनाडू येथून सुमारे 270, त्रिपुरा येथून सुमारे 30, उत्तरप्रदेश येथून सुमारे 1200, उत्तराखंड येथून सुमारे 270, पश्चिम बंगाल येथून सुमारे 226 प्रतिनिधी परिषदेच्या बैठकीत भाग घेतील.

श्री अरुण कुमार जैन
कार्यालय सचीव